असा. क्र. १२ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

मंगळवार, फेब्रुवारी २४, २००९/फाल्गुन ५, शके १९३०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

**सन २००९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २.**—महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश .. .. .. पृष्ठे ६८-७०

### महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ फेब्रुवारी २००९

**MAHARASHTRA ORDINANCE No. II OF 2009.**

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.

**सन २००९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २.**

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६, यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

१९६६ चा महा. ४१.

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ याच्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अध्यादेश, २००९ असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ३१४ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या कलम ३१४ मध्ये, " औरंगाबाद " या मजकुरानंतर, " , पुणे " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. १९६६ चा महा. ४१.

## निवेदन

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. ४१) याच्या कलम ३०९ अन्वये महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. उक्त संहितेच्या कलम ३१४ च्या तरतुदींअन्वये उक्त न्यायाधिकरणाच्या बैठकी सामान्यतः मुख्यालयात, औरंगाबाद व नागपूर येथे भरविण्यात येतात.

२. राज्य शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, उक्त न्यायाधिकरणाकडे राज्याच्या इतर महसूल विभागांच्या तुलनेत पुणे महसूल विभागाच्या बाबतीत, उक्त संहिता व इतर अधिनियम यांखालील प्रलंबित अपिले व पुनरीक्षण अर्जांची संख्या अधिक आहे. म्हणून, शासनाला उक्त संहितेमध्ये उचितरीत्या सुधारणा करून पुणे येथे उक्त न्यायाधिकरणाचे स्वतंत्र खंडपीठ स्थापन करणे इष्ट वाटते.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही, आणि उपरोक्त प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६, यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्त्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक २१ फेब्रुवारी २००९.

**एस. सी. जमीर,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**नीला सत्यनारायण,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. १३ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-३२९/२००६-०८

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

मंगळवार, फेब्रुवारी २४, २००९/फाल्गुन ५, शके १९३०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Land Revenue Code (Amendment) Ordinance, 2009 (Mah. Ord. II of 2009), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

[Translation in English of the Maharashtra Land Revenue Code (Amendment) Ordinance, 2009 (Mah. Ord. II of 2009), published under the authority of the Governor.].

---

**REVENUE AND FORESTS DEPARTMENT**

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 24th February 2009.

## MAHARASHTRA ORDINANCE No. II OF 2009.

*AN ORDINANCE*

*further to amend the Maharashtra Land Revenue Code, 1966.*

WHEREAS both Houses of the State Legislature are not in session ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Land Revenue Code, 1966, for the purposes hereinafter appearing :

Mah. XLI of 1966.



[किंमत : रुपये २०.००]

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause (*1*) of Article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely :—

Short title and commencement.

**1.** (*1*) This Ordinance may be called the Maharashtra Land Revenue Code (Amendment) Ordinance, 2009.

(*2*) It shall come into force at once.

Amendment of section 314 of Mah. XLI of 1966.

**2.** In section 314 of the Maharashtra Land Revenue Code, 1966, after the word "Aurangabad" the word ", Pune" shall be inserted. Mah. XLI of 1966.

STATEMENT

The Maharashtra Revenue Tribunal is established under section 309 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966). As per the provisions of section 314 of the said Code, the said Tribunal shall ordinarily sit at the Headquarters, Aurangabad and Nagpur.

2. It is noticed by the State Government that the number of appeals and revision applications pending in the said Tribunal under the said Code and other enactments, in respect of the Pune Revenue Division, are more as compared to the other Revenue Divisions of the State. The Government, therefore, considers it expedient to establish a separate Bench of the said Tribunal at Pune, by amending the said Code suitably.

3. As both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that the circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Land Revenue Code, 1966, for the purposes aforesaid, this Ordinance is promulgated.

Mumbai, S. C. JAMIR,

Dated the 21st February 2009. Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

NEELA SATYANARAYAN,
Additional Chief Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई